**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपील**
**खुलासा आदेश क्र.१९२२/२०२५ (अपील क्रमांक : के.आर- २०२८/२०१९)**

अपिलार्थी, श्री.दिलीप मुकूंद पाटील,
वसई बाजारपेठ महाकाली मंदिर,
ता.पो.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
तहसिल कार्यालय वसई,
किल्लाबंदररोड,मालोंडे,वसईगाव,
ता.वसई,जि.पालघर ४०१२०२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणीचा दिनांक : २८/०१/२०२०**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २.३.२०१९ | ----- | ६.५.२०१९ | ----- |

अपिलार्थीस दि.२.३.२०१९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली आपले कार्यक्षेत्रातील दहिसर कोशिंबे खार्डी डोलीव कसराळी कण्हेर हया महसूल भातलागवडी शेतजमीनीतून मुंबई बडोदरा राष्ट्रीय महामार्गातून तसेच बुलेट ट्रेन रेल्वे व इतर कॉरीडर महामार्ग प्रस्तावित रुदींकरण व चौपदरीकरण व रेल्वे आरशित ज्या ज्या सर्व बांधित व भूसंपादन जमिनीचे सर्व ७/१२ फेर फार तालुका प्रांत जिल्हा महसूल आदेश देणे. व इतर माहिती देणे, या विषयाची माहिती न मिळाल्यामुळे आयोगास दि. २०.६.२०१९ रोजी सादर केलेल्या द्वितीय अपिलावर आज दिनांक २८/०१/२०२० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान विशद केले की, त्यांच्या दिनांक २.३.२०१९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्याप मिळालेली नाही. यास्तव दिनांक ६.५.२०१९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की, त्यांनी दिनांक १५.१.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा सदरचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये तलाठी सजा दहिसर व शिरसाड यांना हस्तांतर केलेला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती/उत्तर कळविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७ (१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक होते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तसेच त्यांनी अपिलार्थी यांचा सदरचा माहिती अर्ज आयोगाची सुनावणीची नोटीस मिळाल्यावर (म्हणजेच १० महिने उशिराने) तलाठी सजा दहिसर व शिरसाड यांना हस्तांतर केलेला आहे. म्हणून ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीच्या कारवाईस पात्र आहेत.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा खजिना अव्वल कारकून, वसई यांनी अपिलार्थी यांचा सदरचा माहिती अर्ज तलाठी सजा दहिसर व शिरसाड यांना हस्तांतर केल्यानंतर त्यांनीही अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येत नाही. म्हणून तेसुध्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीच्या कारवाईस पात्र आहेत. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१ विद्यमान जन माहिती अधिकारी, तलाठी सजा दहिसर व शिरवाड यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२ तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. यू. एस. हेळकर, निवासी नायब तहसिलदार, वसई यांनी अपिलार्थी यांचा दिनांक २.३.२०१९ रोजीचा माहिती अर्ज १० महिने उशिराने तलाठी दहिसर यांना हस्तांतर केलेला असल्यामुळे, त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३ तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा दहिसर व शिरसाड यांनी अपिलार्थी यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा खजिना अव्वल कारकून, वसई यांनी हस्तांतर केल्यानंतर त्यांनीही अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द देखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

४ उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक के. आर. २०२८/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(के.एल.बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ जानेवारी २०२०.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
प्रथम अपिलीय प्राधिकारी,
तहसिल कार्यालय वसई,
किल्लाबंदररोड,मालोंडे,वसईगाव,
ता.वसई,जि.पालघर ४०१२०२.

## <u>विवेचन</u>

उपरोक्त आदेशान्वये तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये त्यांचेवर शास्ती का लादण्यात येऊ नये याचे स्पष्टीकरण ३० दिवसांत आयोगास सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

सुनावणीस तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.शैलेन्द्र तिडके, तलाठी सजा शिरसाड (सध्या कार्यरत मंडळ अधिकारी बोळींज) उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.यु.एस.हेळकर, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय वसई तसेच तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा दहिसर ता.वसई जि.पालघर हे अनुपस्थित आहेत.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.शैलेन्द्र तिडके, तलाठी सजा शिरसाड यांनी सुनावणीस समक्ष खुलासा सादर केला की, ते तलाठी शिरसाड या पदावर कार्यरत असताना त्यांना माहिती अर्ज प्राप्त झाला नाही. तसेच प्रथम अपील व व्दितीय अपील याबाबत सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती किंवा सुनावणीसाठी हजर राहणे करीता कोणत्याही प्रकारचा संदेश मिळाला नाही. माहे जुन २०१९ मध्ये माझी बदली तलाठी सजा शिरसाठ येथून तलाठी निलेमोरे येथे झाली होती.

**आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता दिसून आले की,** श्री.शैलेन्द्र तिडके यांची माहे जून २०१९ मध्येच तलाठी सजा शिरसाड येथून बदली झाल्याचे दिसून येते. त्याच्या बदलीनंतर माहिती अर्ज, निवासी नायब तहसिलदार वसई यांनी तलाठी सजा शिरसाड यांच्याकडे हस्तांतर केल्याचे दिूसन येते.

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.यु.एस.हेळकर, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय वसई व तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा दहिसर यांनी अद्याप खुलासा सादर केला नाही. सुनावणीस उपस्थित तत्कालिन तलाठी शिरसाड यांनी आयोगाच्या असे निदर्शणास आणले की, ते दोन्ही अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.शैलेन्द्र तिडके, तलाठी सजा शिरसाड यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे.

२) तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.यु.एस.हेळकर, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय वसई व तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा दहिसर हे दोन्ही अधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना कारणे दाखवा नोटीस देवून ५ वर्ष कालावधी उलटून गेलेला आहे. अशा परिस्थितीत त्यांचेवर शास्तीची कारवाई करणे योग्य होणार नाही.

३) प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २० मे, २०२५.

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

Comp-३